# प्रकरण २ रे

## निपाणी शहराची तोंड ओळख

२.१) स्थानियीकरण:-

निपाणी हे शहर कर्नाटक व महाराष्ट्र या दोन्ही राज्यांच्या सीमेवर राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वर असलेले शहर आहे. दोन्ही राज्य सरकारच्या तटयांत सापडलेल्या निपाणी शहराच्या विकासाकडे कर्नाटक सरकारचे पुर्णपणे दुर्लक्ष आहे. तरी सुध्दा ते महाराष्ट्र व कर्नाटक सीमा भागातील एक महत्वाचे शहर आहे.

१९९१ च्या जनगणनेनुसार निपाणी शहराची लोकसंख्या ५१६८० एवढी आहे. शहराची नगरपालिका पुणे बेंगलोर महामार्गावर वसलेली आहे. निपाणी नगरपालीकेच्या कार्यक्षेत्रात दक्षिण उत्तर ४ किलोमीटर व पुर्व पश्चिम ३ किलोमीटर क्षेत्र येते.

निपाणी नगरपालीकेचे वार्षिक उत्पन्न १९९३-९४ च्या वार्षिक अदांज पत्रकाप्रमाणे रू. १,६२,00000 इतके आहे. तर निपाणी नगरपालिकेच्या खर्च १;५६,00000 इतका आहे.

माध्यमिक शिक्षणासाठी निपाणी नगरपालिकेचे एक म्युनिसिपल हायस्कुल आहे त्या शिवाय निपाणी शहरामध्ये आणखीन चार माध्यमिक शाळा व एक महाविद्यालय आहे.

२.२) <u>उद्योगधंदे</u> -

निपाणी हे सीमा भागातील एक महत्वाचे शहर असले तरी या शहराचा म्हणावा तेवढा औद्योगिक विकास झालेला नाही. औद्योगिक विकासाकडे बरेच दुर्लक्ष झालेले आहे. अपेक्षित औद्योगिक विकास न झालेने निपाणीतील सामान्य जनता परिस्थितीशी तडजोड करुन मिळेल तो व्यवसाय करीत आहेत.

चिक्कोडी तालुक्यातील निपाणी व निपाणी परिसरातील सर्व भाग हा शेती प्रधान असल्यामुळे व शेतीतील प्रमुख पिक तंबाखु असल्यामुळे निपाणीमध्ये तंबाखु व्यवसाय हा तेजीत आलेला व्यवसाय आहे. तंबाखुवर प्रक्रिया करणाऱ्या कारखान्याचा विकास झालेला आहे. तसेच प्रक्रिया केलेल्या तंबाखु पासुन बिडी निर्माण करणारे कारखाने निर्माण झालेले आहेत.

तंबाखु व्यवसायात निपाणीतील व्यापारी व श्रीमंत वर्ग गुंतलेला आहे. लोकांना या व्यवसायामुळे सुमारे ७ ते ८ हजार लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. तसेच बिडी निर्माण करणाऱ्या कारखान्यात जवळ जवळ ४ हजार कामगार गुंतलेले आहेत. तंबाखु व्यवसायात गुंतलेल्या एकुण रोजगारापैकी ९०% रोजगार हा स्त्री कामगारांचा आहे. या शिवाय शहरातील हद्दीत अॅल्युमिनियम फॅक्टरी (सुभाष मेटल इंडस्ट्रीज) आहे. या फॅक्टरीमध्ये बरेच लोक काम करीत आहेत. सॉ मिल, साबण कारखाने, तसेच सिमेंटच्या वस्तु

तयार करणारे अनेक छोटे, मोठे कारखाने, ऑईल मिलस् व आईस फॅक्टरी थोड्याफार प्रमाणात पॉवर लूमस ही केंद्रित आहेत. तक्ता क्र. २.१ मध्ये निपाणीतील प्रमुख उद्योगधंद्यांचे वर्गीकरण दिले आहे.

तक्ता क्रमांक २.१

निपाणीतील कांही प्रमुख उद्योगधंदे

| अ. न | उद्योगधंद्यांचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | तंबाखूवर प्रक्रिया करणारे कारखाने | ३३ |
| २ | तंबाखु गुदामे | १५ |
| ३ | ॲल्युमिनियम फॅक्टरी | १ |
| ४ | सिमेंट क्रॉंक्रीट मॉडेल्स व डिझाईन (सिमेंट फॅक्टरी) | ५ |
| | अ. गंगा कनस्ट्रक्शन इंडस्ट्रीज पी.बी.रोड, निपाणी | |
| | ब. डी. आर.पटेल, मुरगुड रोड, निपाणी | |
| | क. उमय्या ट्रेडींग कंपनी मुरगुड रोड, निपाणी | |
| | ड. स्वस्तिक पाईप कंपनी, चिक्कोडी रोड, निपाणी | |
| | इ. सोमनाथ इंडस्ट्रीज, अक्कोलरोड, निपाणी | |

| अ. नं. | | उद्योगधंद्यांचे नांव | संख्या |
|---|---|---|---|
| ५ | | बिडी निर्माण करणारे कारखाने | ८ |
| | अ. | मारुती बिडी , एम कदम आणि कंपनी | |
| | ब. | किलास बिडी फॅक्टरी कुरबेटी | |
| | क. | मे. पिस्तुल बिडी वर्क्स, आर.व्ही.कदम | |
| | ड. | ए.ए.मोमीन बिडी, तावटे गल्ली | |
| | इ. | पी.डी. इंगळे बिडी, बागवान गल्ली | |
| | ई. | कोठीवाले बिडी वर्क्स, कोठीवाले | |
| | उ. | जी.एम. बिडी, महात गल्ली | |
| | ऊ | धोंडिबा आप्पासाहेब महाजन, मुगळे गल्ली, | |
| ६ | | सॉ मिल्स | ५ |
| | अ. | कन्हैया सॉ मिल मुरगुड रोड | |
| | ब. | कृष्णा विजय सॉ मिल चिक्कोडी रोड | |
| | क. | विष्णु सॉ मिल मुरगुड रोड | |
| | ड. | शंकर विजय सॉ मिल मुरगुड रोड | |
| | इ. | तुकाराम सिद्दु लोहार सॉ मिल, साखरवाडी, | |
| ७ | | साबण कारखाने | २ |
| | अ. | श्री राम सिंडीकेट अशोकनगर | |
| | ब. | स्वस्तिक सोप फॅक्टरी | |

| अ.न | उद्योगधंद्यांचे नांव | | संख्या |
|---|---|---|---|
| ८ | | आईल मिल्स् | ४ |
| | अ. | अनंत आईल मिल्स, निपाणाकर वाडा | |
| | ब. | मोहन आईल मिल्स, कुंभारगल्ली, | |
| | क. | गजानन आईल मिल्स, पी.बी.रोड, | |
| | ड. | पी.ए. बागेवाडी आईल मिल्स चिकोडी रोड | |
| ९ | | आईस फॅक्टरी | ३ |
| | अ | दयाराम एम चांदवाणी, मुरगुड रोड | |
| | ब. | अशोक आईस फॅक्टरी, पी. बी. रोड | |
| | क. | जी. जी. चौगुले, शिवाजी नगर | |
| १० | | पॉवर लूम्स | १९ |
| ११ | | प्लॅस्टीक वस्तु उत्पादन करणारे कारखाने | १ |
| १२ | | टाईल्स फॅक्टरी | २ |

आधार:- नगरपालिकेतील दप्तर नोंदणी रजिस्टर प्रमाणे कार्यालयीन माहिती

निपाणीचा जो थोडा फार विकास झालेला आहे. तो तंबाखु व्यवसायामुळे हा व्यवसाय सुधारत आहे. कारण निपाणी व निपाणी परिसरात तंबाखुचे उत्पादन होते म्हणून या व्यवसायाच्या विकास झालेला आहे. या व्यवसायामुळे निपाणी परिसरातील थोड्या फार प्रमाणत रोजगार निर्मिती झालेली आहे. निपाणी शहरामध्ये औद्योगिक व्यवसायाचा विकास व्हावयाचा असेल तर कर्नाटक शासनाने या शहराकडे कटाक्षाने लक्ष्य दिले पाहिजे व औद्योगिक विकासाला आवश्यक असणारे सरकारी सहाय्य व अनुदान देऊन निपाणी शहराचा विकास साध्य केला पाहिजे.

२.३ व्यापार आणि वाणिज्य:-

निपाणी शहराच्या आजु बाजुला ४० ते ५० खेडी आहेत. या परिसरात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. प्रमुख शेती उत्पादनामध्ये तंबाखु, भुईमुग, ज्वारी मिरची इ. च्या समावेश आहे. या शेती उत्पादनाची खरेदी विक्री शहराच्या आठवड्याच्या (गुरुवार) बाजारा दिवशी होते.

तबाखु हे महत्वाचे व्यापारी पिक आहे या पिका-पासुन शेतकऱ्याना आपली आर्थिक बाजु सुधारता येऊ शकते साधारणता: एका एकरामध्ये तंबाखुचे १३ ते १४ बोद उत्पादन होते. (१ बोद = ५० ते ६० किलो.ग्रॅम) १९९३-९४ मध्ये तंबाखुच्या एका किलोला २० ते २२ रु. दर मिळाला आहे. या पिकांच्या विक्रीमुळे निपाणी शहरात

अनेक लहान मोठया उलाढाली होत असतात.

निपाणी शहरामध्ये व्यापारी पेठेत आणखी एक तेजीत आलेला व्यापर म्हणजे कापड व्यापार होय, कापड व्यापारामध्ये निपाणीतील विशिष्ट लोकांची मक्तेदारी आहे. गुजराती लोकांची या व्यापारामध्ये जवळ जवळ मक्तेदारी आहे. आणखी एक महत्वाच्या व्यापार म्हणजे भांडी दुकाने भांडी व्यापार हा एक तेजीत आलेला आणखी एक व्यापार आहे. त्याबरोबर नारळाचा व्यापार, सराफी दुकाने, स्टेशनरी दुकाने, जनता बझार हॉटेल्स व औषध दुकाने इ. व्दारे व्यापार चालतो. बाझारा दिवशी मिरची व गुळाचा मोठा व्यापार होतो. बेळगांव जिल्हातील कांही उत्पादीत होणारा भाजीपाल्याची मोठी विक्री निपाणीत होते. निपाणीतील व्यापाराची माहिती तक्ता क्रं. २.२ मध्ये दिलेली आहे.

## तक्ता क्रमांक २.२

## निपाणीतील प्रमुख व्यापार

| अ.न | व्यापार व्यवसायाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | कापड दुकाने | ३३ |
| २ | स्टेशनरी दुकाने | २३ |
| ३ | भांडी दुकाने | १४ |
| ४ | बँगल शॉप | १५ |
| ५ | लोखंड व लोखंडी वस्तु व्यापार | १० |
| ६ | फोटो ग्राफी स्टुडीओ | ८ |
| ७ | चटणी कांडप केंद्रे | १६ |
| ८ | पेट्रोल पंप | ०२ |
| ९ | गॅस वितरण एजन्सीज | ०२ |
| १० | मोटर स्पेअर पार्टस् | ११ |
| ११ | प्लॅस्टीक मटेरियल विक्री | ०१ |
| १२ | रबर व रबराच्या वस्तुंची विक्री | ०१ |
| १३ | मोटार बॉडी बिल्डींग वर्क्स | ०२ |
| १४ | ग्लास आणि ग्लासाच्या वस्तु | ०३ |
| १५ | सार्वजनीक रॉकेल विक्री केंद्र | ०१ |
| १६ | मंगलोरी टाईल्स विक्री उपक्रम | ०३ |
| १७ | प्लायवूड सेंटर | ०१ |

आधार:-

नगरपालिकेतील दप्तर नोंदणी रजिस्टर प्रमाणे कार्यालयीन माहिती.

२.४) वहातुक व दळणवळण:-

निपाणीमध्ये कर्नाटक शासनाचे एक मध्यवर्ती बस स्थानक आहे. या मध्यवर्ती बसस्थानकापासुन महाराष्ट्रातील कांही गांवे व कर्नाटकाच्या सरहद्दीतील कांही गांवे जोडली गेलेली आहेत. निपाणी शहरापासुन पश्चिमेला गारगोटी, राधानगर, व कणकवली तसेच तारळे ही गावे निपाणी बस स्थानकापासुन जोडलेली आहेत. तसेच निपाणी ते कोल्हापूर, निपाणी ते इंचलकरंजी निपाणी ते सांगली यामहाराष्ट्रातील मोठया शहराना निपाणीतुन सुलभपणे जाता येते तसेच कर्नाटकातील चिक्कोडी विजापुर रायबाग, अथणी बेळगांव, गोकाक, हुक्केरी, हुबळी, धारवाड, बेंगलोर, पर्यंत निपाणीतुन बस जाते.

तसेच ट्रान्सपोर्ट कंपनीचे बुकींग ऑफीसे एकंदर ८ आहेत. तसेच निपाणीमध्ये खेतांची वहातुक यंत्रणा असणारा वर्ग सुध्दा आहे. पट्णशेटी आणि कंपनी तसेच बी. पी.टी. ट्रान्सपोर्ट कंपनी महत्वाची आहेत. तसेच व्यापारी माल वाहुन नेण्यासाठी टेंपो वहातुक महत्वाची आहे. एकंदरीत ट्रक, टेम्पोचा व्यवसाय देखील या शहरात तेजीत चालतो. अजुनही वहातुक यंत्रणा कार्यक्षम व्हावयाची असेल तर सीमा प्रश्न सुटावयास हवा त्यावेळी निपाणीतील वहातुक यंत्रणा एकदम कार्यक्षम होईल.

निपाणीतील दळण वळण यंत्रणा कार्यक्षम होण्यासाठी निपाणीमध्ये एक निपाणी दूरवाणी केंद्र आहे. एक महत्वाचे दूरवाणी केंद्र म्हणून याचा उल्लेख करता येईल. या दूरवाणी केंद्रामधील टेलिफोन धारक संख्या ९५७ एवढी आहे. बेळगांव विभागामध्ये या दूरवाणी केंद्राचा दुसरा क्रमांक लागतो. तर बेळगांव दूरवाणी केंद्राचा पहिला क्रमांक लागतो. निपाणीहुन इतर गावाशी सरळ ४० ट्रंक लाईन्स जोडलेल्या आहेत.

देशी व विदेशी टंककाल्स करण्यासाठी व ९ केंद्रे कार्यकरीत आहेत. त्यापैकी एक दळणवळण खात्याचे आहे.

या केंद्राचे एक वैशिष्ठ्य म्हणजे मल्टी एक्सेस ग्रामीण रेडिओ, ही ९ केंद्रे या दूरवाणी केंद्राने सुरु केलेली आहेत.

मानकापुर, यमगर्णी, बुदलमुख पांगिरे, बोरगांववाडी, कुर्ली, यरनाळ, शिप्पुर, आप्पाचिवाडे, गोंदुकुप्पी या खेड्याना ही योजना सुरु आहे.

४.५) शहरातील दुग्धव्यवसाय :-

निपाणी हे सीमा भागातील मध्यवर्ती शहर आहे. या शहरामध्ये अनेक व्यापार व व्यवसाय चालतात आहेत. या बरोबर दूध व्यवसाय सुध्दा एक महत्वाचा व्यवसाय समजला जातो. निपाणी व निपाणी भागचा परिसर हा शेती प्रधान असल्यामुळे दूध व्यवसायाला थोडे फार महत्व आहे. कारण दूध व्यवसाय हा शेतीला पूरक व्यवसाय म्हणून ओळखला जातो. म्हणून दुग्ध व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या आर्थीक परिस्थितीमध्ये वाढ होते.

निपाणीतील दूध व्यवसाय हा पूर्वी पासुन चालत आलेला आहे. या दूग्ध व्यवसायात सध्या दूध उत्पादक, गवळीलोक, खाजगी डेअरी सहकारी डेअरी असे चार घटक गुंतलेले आहेत.

अजुन निपाणी शहरामध्ये या चार घटकाचे अस्तित्व आहे. निपाणी परिसरातील कांही दूध उत्पादक स्वत: निपाणी शहरामध्ये दूध विक्री करतात त्यांचे प्रमाण अल्प आहे. त्यानंतर गवळी लोक हे गावोगावी दूध संकलन करुन ते दूध निपाणी शहरामध्ये विक्री करतात. या गवळी लोकांचा हा व्यवसाय फार पुर्वी पासुन चालेला आहे . आजुनही हे गवळी लोक शहरामध्ये फिरुन दूध वितरण करतात. निपाणी मध्ये सध्या ६० ते ७० गवळी लोक दूध वितरण करतात.

त्यानंतर खाजगि डेअरीचे प्रमाण सुध्दा निपाणी शहरामध्ये वाढत आहे. सध्या निपाणी मध्ये २५ खाजगी दूध डेअरी , कार्य करीत आहेत या दूध डेअरी गवळी लोकांकडून किंवा दूध उत्पादकाकडून दूध संकलन करतात. व वितरण करतात. या खाजगी डेअरी जवळ जवळ १२०० लिटर ची दूधाची विक्री करतात. व इतर दूग्ध पदार्थांची विक्री करतात. उदा. लस्सी, दही, तुप लोणी वगैरे परंतु त्याडेअरीचे दुग्ध पदार्थांची विक्री करण्याचे प्रमाणे अगदी अल्प आहे.

त्यानंतरचा महत्वाचा घटक म्हणाजे सहकारी दूध डेअरी होय. निपाणीमध्ये ३ सहकारी दूध डेअरी आहेत. त्यामध्ये दोन मोठया स्वरुपाचा आहेत. या सहकारी दूध डेअरीच्या दूधाची विक्री ही १००० लिटर पर्यंत होते. निपाणी शहरात या चार घटकापासुन ४००० लिटर दूध विक्री केले जाते. त्यामध्ये सहकारी डेअरीचे प्रमाण हे सुमारे २५ % आहे.

समारोप :-

निपाणी हे शहर महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सिमेवरील महत्वाचे शहर समजले जाते. या सीमाभागातील शहराचा औद्योगिक विकास हा संथगतीने होत आहे. या शहरातील तंबाखु व्यवसाय हा तेजीत चाललेला आहे. या व्यवसायामुळे निपाणी व निपाणी परिसरातील रोजगार व आर्थिक परिस्थीतीमध्ये वाढ होत आहे. त्याच बरोबर शेती व्यवसायाला पूरक व्यवसाय म्हणून थोड्या प्रमाणात निपाणी शहरात दुध व्यवसाय वाढत आहे. या दुध व्यवसायातील सहकारी दुध व्यवसाय हा मोठया प्रमाणात आहे. या सहकारी दुध व्यवसायाचे एकुण दुध व्यवसायातील प्रमाण फार मोठे आहे.